श्री.आर.टी.शेलार, वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांची बदली करणेबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः आपना- २०१७/प्र.क्र.२३८/पापु १५

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, नवीन मंत्रालय इमारत,
क्रॅाफर्ड मार्केटजवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४००००१
तारीखः २२ मार्च,२०१८

वाचा:-

1) **शासन आदेश क्रमांकः आपना ०२१७/प्र.क्र.३९/पापु १५, दि.१२.०५.२०१७**
2) **मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ मुंबई येथील मूळ अर्ज.क्र. ८१३/२०१७ प्रकरणी मा.न्यायाधिकरणाने पारीत केलेल आदेश दि.२७.०९.२०१७**

शासन आदेश:-

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये श्री.आर.टी.शेलार, वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांची प्रशासकीय कारणास्तव संदर्भाधिन क्र.१ च्या शासन आदेशान्वये उपसंचालक, पुणे कार्यालय येथून वरिष्ठ भूवैज्ञानिक, हिंगोली कार्यालयात बदली करण्यात आली होती. त्याअनुषंगाने उपसंचालक, पुणे कार्यालयाने त्यांना हिंगोली येथे रुजु होण्यासाठी कार्यमूक्त केले होते. तथापि सदर बदली आदेशाविरुध्द त्यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ मुंबई येथे मूळ अर्ज.क्र.८१३/२०१७ दाखल केलेला होता. सदर मूळ अर्जावर मा.न्यायाधिकरणाने पारीत केलेले संदर्भाधिन.क्र.२ चे आदेश विचारात घेऊन श्री.आर.टी.शेलार यांचे संदर्भाधिन क्र.१ येथील आदेशान्वये वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, हिंगोली येथे करण्यात आलेले बदली आदेश रद्द करुन वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, अकोला येथील रिक्त पदावर त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

हे बदली आदेश तात्काळ अंमलात येत असून श्री.आर.टी.शेलार यांनी बदलीच्या कार्यालयात तात्काळ रुजु व्हावे. श्री.आर.टी.शेलार यांनी उक्त पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होण्यास विलंब केल्यास अथवा रुजु न झाल्यास किंवा बदली आदेशात बदल करुन घेण्यासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास ते शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील.

श्री.आर.टी.शेलार हे उक्त पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होण्यासाठी आल्यानंतर त्यांना तात्काळ रुजु करुन घ्यावे. त्यांना रुजु करुन न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतिक्षाधीन काळ ठरवून काम न

देता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित कार्यालय प्रमुखास व अस्थापना अधिका-यास जबाबदार धरण्यात येईल.

संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांना सूचित करण्यात येते की, श्री.आर.टी.शेलार हे बदली झालेल्या कार्यालयात रुजु झाले आहेत किंवा कसे, याची माहिती तात्काळ शासनास सादर करावी.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२२१५००२८६२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Bhagwan Sawant

Digitally signed by Mahesh Bhagwan Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1f670a17d77c8ddff69694de2a07b7ff855dafef954aefa82ca28bd6cc6adb6, cn=Mahesh Bhagwan Sawant
Date: 2018.03.22 18:59:24 +05'30'

(महेश सावंत)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री.आर.टी.शेलार, वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (संचालनालयामार्फत)

प्रत,

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,शिवाजी नगर, पुणे.
५. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, औरंगाबाद/अमरावती
६. निवडनस्ती- कार्यासन पापु १५.